# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः,रामटेक
# (महाराष्ट्रम्)

राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषदेद्वारा मान्यताप्राप्त ग्रेड ''B++''

**रामटेक कार्यालय** – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक – 441106, जि.नागपूर

**नागपूर कार्यालय** – शैक्षणिक परिसर, पाचवा माळा, ना.सु.प्र. संकुल, मोरभवन जवळ, सीताबर्डी, नागपूर 440012

website : www.kksanskrituni.digitaluniversity.ac    Email : kksuacad@gmail.com

Ramtek: Ph. 07114-255747, 255549, Fax 256476    Nagpur: Ph. 0712-2542932, Fax: 0712-2560992


**पत्र क्र. ककासंवि/विद्या/2021/108**    **दिनांक : 25.11.2021**

## –: अधिसूचना :–

**विषय :– विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. 25.03.2021 रोजी (SWAYAM) अंतर्गत ऑनलाईन अभ्यासक्रमांसंबधी प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेबाबत...**

सर्व संबंधित **शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांना** कळविण्यात येते की, विश्वविद्यालयाच्या विद्वत परिषद सभा दि. 31.08.2021 च्या निर्णयानुसार अभ्यासमंडळाच्या कक्षेत येणाऱ्या CBCS (Choice Based Credit System) प्रणालीने पूर्वी तयार केलेल्या व प्रस्तावित अभ्यासक्रमांकरिता Credit Transfer Policy ची अंमलबजावणी करण्या**त आली असून संबंधितांनी यांची नोंद घ्यावी. सफल अमलबजावणी करिता सोबत जोडलेल्या मार्गदर्शक नियमावलीचा अवलंब करावा.**

**(डॉ. स्मिता फडणवीस)**
उपकुलसचिव (विद्या)

**प्रत माहितीकरिता–**

1) मा. कुलगुरू कार्यालय, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
2) मा. कुलसचिव, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
3) मा. संचालक, बी.पी.डी. क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
4) मा. अधिष्ठाता, सर्व संकाय, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
5) मा. परीक्षा नियंत्रक, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
6) मा. संचालक, शैक्षणिक परिसर रामटेक/वारंगा, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.
7) सहायक कुलसचिव, महाविद्यालय शाखा, क. का. संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक.

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

# Kavikulaguru Kalidas Sanskrit University, Ramtek

Reference: Gazette of India (Extraordinary) Part-III, Section-4 No. 295, UGC (Credit Framework for Online Learning Courses through SWAYAM) Regulation, 2016, dated 19/07/2016 & Gazette of India (Extraordinary) Part-III, Section-4 No. 120, UGC (Credit Framework for Online Learning Courses through SWAYAM) Regulations, 2021, dated 25/03/2021.

With reference to Academic Council Meeting dated 8th July 2019, (Agenda Item No.30) wherein MOOCs Credit Transfer Policy was adopted in the CBCS scheme, In continuation to that, following modalities are proposed to introduce the Useful Guidelines for Credit Transfer Implementation to the University Student Marks Sheet under NPTEL & other than-NPTEL (SWAYAM) MOOCs offered through SWAYAM (Study Webs of Active-Learning for Young Aspiring Minds) Portal. Guidelines are presented in Marathi & English languages where, the total items are fifteen.
The Coordinator
University SWAYAM Unit, KKSU, Ramtek

---

## एन.पी.टी.ई.एल. व एन.पी.टी.ई.एल.इतर (स्वयम) ऑनलाईनज्ञानार्जन अभ्यासक्रमांचे विश्वविद्यालयीन अंकतालिकेत क्रेडिट ट्रॉन्सफर करावयास उपयोगी मार्गदर्शक नियम

---

1) सत्रारंभी विद्यापीठ ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमसमितीने ठरवून दिलेल्या ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमाचे विद्यापीठातील ठराविक अभ्यासक्रमाठिकाणी विद्यापीठविभागांमध्ये अथवा संलग्नित महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या अंकतालिकेत विद्यापीठ परीक्षा विभागांद्वारे क्रेडिट ट्रॉन्सफर करण्यात येईल.

त्यासाठी महाविद्यालयप्राचार्य अथवा विद्यापीठाविभागप्रमुखांद्वारे संबंधित स्वयमपरीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा क्रेडिटट्रान्स्फर बाबत विनंतीचा उत्तीर्णप्रमाणपत्रासह अर्ज विद्यापीठपरीक्षा विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येईल. त्यासाठी महाविद्यालयाचे नामोनित स्वयम–मेंटर प्राध्यापक व विद्यापीठविभाग संदर्भात विद्यापीठाचे स्वयम–समन्वयक महाविद्यालयप्राचार्य किंवा विभागप्रमुखांना अपेक्षित सहकार्य करतील.

2) विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमांमध्ये क्रेडिट ट्रॉन्सफरकरिता आवेदन अग्रेषित करत असताना विद्यापीठ–ऑनलाईन–ज्ञानार्जन– अभ्यासक्रम समितीने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमाचे तंतोतंत पालन करणे अपेक्षित राहील. सोबतच, विद्यापीठसंकेतस्थळावर प्रकाशित MOOCs List, MOOCs Credit Transfer Circular/Notification, MOOCs Directions व सदर परीक्षोपयोगिनियमावली जोडणे अपेक्षित राहील.

3) विद्यापीठऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमसमितीच्या वतीने सी.बी.सी.एस. पाठ्यक्रमातील ऐच्छिक (Elective) अभ्यासक्रमाच्याअंतर्गत प्राध्यान्याने ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रम पर्यायी ठरवून दिले जातील. त्यानुषंगाने विद्यापीठविद्याविभागाने विद्यापीठीय पाठ्यक्रमांमधील अभ्यासक्रमामध्ये (स्वयम बाबत पर्यायसूचक) आवश्यक ते बदल करुन घ्यावेत.

4) ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रम **चार** आठवडे, **आठ** आठवडे, **बारा** आठवडे, **पंधरा** आठवडे, **सोळा** आठवडे व **चोवीस** आठवडयांचे असतात.

5) ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमांच्या ठराविक अवधींप्रमाणे त्यांचे कोर्स क्रेडिट्स NPTEL (SWAYAM), CEC (SWAYAM) तसेच अन्य सर्व राष्ट्रिय समन्वयक (National Coordinators) संस्थांच्यावतीने प्रसिद्ध केलेल्या Recommendations/Guidelines प्रमाणे चारआठवडे कालावधीचे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रम एकूण एक/दोन क्रेडिटससाठी, आठआठवडे कालावधीचे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रम एकूण दोन/तीन क्रेडिटससाठी, बाराआठवडे कालावधीचे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रम एकूण तीन/चार क्रेडिटससाठी, पंधरा/सोळा आठवडेकालावधीचे ऑनलाईनज्ञानार्जन अभ्यासक्रम एकूण चार/पाच क्रेडिटस साठी, याप्रमाणे राबविणे सुचविले आहे. म्हणून–

- चार आठवडे कालावधी असणारे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रम एकूण एक अथवा दोन क्रेडिट ट्रॉन्सफरसाठी ग्राहय राहतील.
- आठ आठवडे कालावधी असणारे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमाचे क्रेडिट दोन अथवा तीन क्रेडिट ट्रॉन्सफरकरिता ग्राहय राहतील.
- बारा आठवडे कालावधी असणारे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमाचे क्रेडिट चार अथवा पाच क्रेडिट ट्रॉन्सफरकरिता ग्राहय राहतील.
- पंधरा /सोळा आठवडे कालावधी असणारे ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमाचे क्रेडिट पाच अथवा सहा क्रेडिट ट्रॉन्सफरकरिता ग्राहय राहतील.

6) महाविद्यालये तसेच विद्यापीठविभागांद्वारे अग्रेषित केली जाणारी स्वयम क्रेडिट ट्रान्स्फर संबंधित विद्यार्थ्यांची आवेदने त्या–त्या सत्रात संबंधित ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाल्यानंतर किमान 10 दिवसांच्या आत विद्यापीठपरीक्षाविभागाकडे पाठविणे बंधनकारक राहील.

विशेषस्थिती/बाब म्हणून संबंधितसत्रात विद्यापीठपाठ्यक्रम/अभ्यासक्रमनिशी ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमांची परीक्षा लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांची लिखितमाहिती विद्यापीठपरीक्षाविभागाकडे विद्यापीठपरीक्षाफॉर्म भरण्याच्या किमान अगोदर प्राप्त होणे अपेक्षित राहील. याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे नामोनित मेंटर प्राध्यापक/प्राचार्य व संबंधित विद्यापीठविभागप्रमुखांची राहील. जेणे करुन विद्यापीठाला पुढील कार्यवाही करणे सोपे होईल.

7) विद्यापीठविभागात किंवा संलग्नितमहाविद्यालयात प्रवेशितविद्यार्थ्याने उत्तीर्ण केलेला ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रम विद्यापीठाच्यावतीने क्रेडिट ट्रॉन्सफर करण्याकरिता अभ्यासक्रमाच्या निकालप्रसिद्धीच्या दिनांकापासून एक वर्ष पर्यंत वैद्य राहील. मात्र, क्रेडिट ट्रान्सफरसाठी

वर्षांदरम्यान सदर विद्यार्थ्यांने केलेले आवेदन व आवेदनाच्या दिनांकी किंवा तात्कालिक षाड्मासिक सत्रात सदर विद्यार्थी विद्यापीठ पाठ्यक्रमामध्ये खण्डरहित अध्ययनरत असावा.

8) ऑनलाईनज्ञानार्जनअभ्यासक्रमात प्राप्तअंकाचे किंवा प्रतिशतांचे विद्यापीठपाठ्यक्रमाच्या ग्रेड मध्ये होणारे रुपांतरण त्या–त्या पाठ्यक्रमाच्या विश्वविद्यालयाने ठरवून दिलेल्या अध्यादेशातील ग्रेड फॉरमॅट प्रमाणे राहील. (मात्र ध्यातव्य राहील की ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमाचे किमान पासिंग मार्कस 40 किंवा 40 पेक्षा अधिक असतात.)

9) स्वयमच्यावतीने राबविले जाणारे अभ्यासक्रम 75 : 25 (प्रोक्टर्ड ऑनलाईनपरीक्षा गुण : असाइमेन्ट गुण) या स्वरूपाचे असतात. वेळोवेळी हे स्वरूप बदलण्यात आलेले दिसून येते. प्राप्त प्रमाणपत्रावर याचा स्पष्ट उल्लेखही असतो. मात्र, विद्यापीठपाठ्यक्रमातील संबंधितअभ्यासक्रमाचे लेखीपरीक्षागुण : आन्तरिकगुण स्वरुप वेग–वेगळे (उदा. 60:40, 70:30 किंवा 80:20 इ.) असू शकते. तेव्हा स्वयम अभ्यासक्रमाच्या प्राप्त प्रोक्टर्डऑनलाईनपरीक्षा गुण : असाइमेन्टगुण प्रारूपाचे विद्यापीठपाठ्यक्रम–निर्धारित (उदा. 60:40, 70:30किंवा 80:20 इ.) मध्ये प्रमाणात गुणदान ठरवावे व अंकतालिकेत मांडावे. उदाहरणार्थ– 'अ' या बी.ए.(संस्कृत)च्या प्रथमसत्रातील विद्यार्थ्याने सत्रारंभी विद्यापीठऑनलाईन ज्ञानार्जनसमितीने सभेत ठरवून दिलेल्या व अभ्यासमंडळाध्यक्षांद्वारे प्रमाणित (उदा.) Introductions to Spoken Sanskrit (संस्कृतसंभाषणअभ्यासक्रम) या स्वयम अभ्यासक्रमासाठी बी.ए.(संस्कृत) प्रथमसत्रातील अमुक ठरवून दिलेल्या अभ्यासक्रम–1 संस्कृत अभ्यासक्रमाच्या जागी नामांकन केले. वेळोवेळी ऑनलाईन अभ्यास पूर्ण करत असाइग्नमेंट पूर्ण केल्या तसेच ठराविक शुल्क भरून परीक्षा नोंदणी केली व परीक्षा ही उत्तीर्ण झाला. 'अ' विद्यार्थ्याचे प्राप्त गुण (उदा.) 45/75 : 15/25 या प्रमाणे निकाल 60 टक्के आहे. तेव्हा 'अ' या विद्यार्थ्याचा प्राप्त निकाल त्याच्या बी.ए.(संस्कृत)प्रथमसत्रातील अमुक अभ्यासक्रमाच्या ठिकाणी अध्यादेशातील ठरलेल्या 80:20 इ. गुणप्रारूपाच्या प्रमाणात गुणदान स्वरूपात रूपातरित करावा व अंकतालिकेत अमुक अभ्यासक्रमनावाच्या जागी SWAYAM Online Course: Introductions to Spoken Sanskrit (संस्कृतसंभाषणअभ्यासक्रम) अंकतालिकेत नमूद करावा.

10) संबंधितविद्यार्थी स्वयम–अभ्यासक्रमाची (प्रोक्टर्ड ऑनलाईन) परीक्षा लिहिण्यास काही अपरिहार्यकारणाने अनुपस्थित राहिल्यास किंवा परीक्षेत अनुत्तीर्ण ठरल्यास –

पर्याय– 1

संबंधितविद्यार्थ्याच्या अंकतालिकेतील निकाल उपरोक्त बाब. क्र. 9 मधील उल्लेखाप्रमाणे संबंधित पाठ्यक्रमाच्या अमुक अभ्यासक्रमाच्या नावाच्या जागी स्वयमअभ्यासक्रम नामकरणासह पाठ्यक्रम गुणदान प्रमाणात अनुत्तीर्ण दाखविला जाईल. यापुढे सदर विद्यार्थ्याला संबंधितस्वयम अभ्यासक्रमाची परीक्षा किंवा संबंधित विद्यार्थ्याच्या विनंती अर्जावरुन विद्यापीठमूकसमितीने सुचविलेल्या स्वयम अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यापीठपाठ्यक्रमाच्या उपान्त्यसत्रापर्यंत उत्तीर्ण करून स्वयमचे उत्तीर्णप्रमाणपत्र अंतिमसत्राच्या परीक्षाफॉर्म जमाकरण्याच्या तारखेपूर्वी परीक्षाविभागाला पाठविणे अनिवार्य राहील, याची जबाबदारी विद्यार्थी/संबंधितप्राचार्य/संबंधितविभागप्रमुखाची राहील.

पर्याय– 2

संबंधितसत्रातील विद्यापीठीयसत्रपरीक्षा सुरू होण्यापूर्वी तो विद्यार्थी संबंधितप्राचार्य/संबंधित विभागप्रमुखांद्वारे अग्रेषित स्वतःच्या लेखी अर्जाद्वारे किंवा इमेलद्वारे विद्यापीठपरीक्षाविभागाला 'माझी स्वयमऑनलाईनपरीक्षा सकारण वगळता विद्यापीठनिधारित सदरसत्रातील लेखीपरीक्षा लिहिण्यासंबंधी विद्यापीठअनुमती संबंधीचा विनंती बाबतचा अर्ज करू शकतो. मात्र याबाबतचा अर्ज संबंधित सत्रातील विद्यापीठपरीक्षा सुरू होण्यापूर्वी परीक्षाविभागात प्राप्त होणे अनिवार्य राहील. विद्यापीठपरीक्षाविभागातून दिल्याजाणाऱ्या संबंधित–अनुमतीची खात्री करून घेण्याचे दायित्व संबंधित विद्यार्थी/प्राचार्य/विभागप्रमुखांचे राहील. खात्रीनंतरच लेखी परीक्षेला बसणे ग्राह्य राहील.

11) प्रोक्टर्ड ऑनलाईन परीक्षेत अनुत्तीर्ण किंवा अनुपस्थित विद्यार्थ्याचे स्वयम अभ्यासक्रमादरम्यानचे असाइमेन्टचे (आन्तरिक) गुण हे किमान उत्तीर्ण गुण(10/25) किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास त्याआधारे सदर विद्यार्थ्याकरिता पुढील सत्रांमध्ये विद्यापीठाच्या संबंधितपाठ्यक्रमातील निर्धारित अभ्यासक्रमाची लेखीपरीक्षेला नोंदणी करून विद्यापीठाची निर्धारित परीक्षा लिहिण्याची व संबंधितआन्तरिक गुणपरीक्षा लिहिण्यासंबंधी मुभा राहील. यावरून प्राप्त होणाऱ्या सुधारित अंकतालिकेत स्वयमऑनलाईनअभ्यासक्रमाचा उल्लेख राहणार नाही. या पर्यायामुळे एखादा विद्यार्थी सतत प्रोक्टर्ड स्वयम परीक्षेत असफल राहिल्यास त्यास संबंधितपाठ्यक्रमातील निर्धारित अभ्यासक्रमाच्या परीक्षेत सहभागी होऊन पाठ्यक्रमात सफलता प्राप्त करणे शक्य होईल व सर्वसाधारण विद्यार्थ्यांप्रमाणे त्याची अंकतालिका राहील.

12) काही विशेष परिस्थितींना (उदा. राष्ट्रियमहामारी, ताळेबंदी किंवा आपात्कालीनस्थिती) लक्षात घेता, स्वयम द्वारे प्रोक्टर एग्झाम घेवू न शकल्यास उपाय योजना म्हणून विद्यार्थ्याने मूक अभ्यासक्रमात प्राप्त केलेल्या असाइमेंट मार्कस् ला गृहीत धरून मूक प्रोक्टरपरीक्षेच्या जागी विश्वविद्यालयस्तरावर पेपर–पेन वैकल्पिकप्रश्नपरीक्षा घेण्यासारखा किंवा इतर योग्य तो (परिस्थित्यनुरूप) नेमका मार्ग विश्वविद्यालयमूककमिटीच्यावतीने सुचविला जाईल. त्याप्रमाणे विद्यापीठपरीक्षाविभाग परीक्षा आयोजित करेल.

13) विश्वविद्यालय व संलग्नित महाविद्यालयातील सर्वविद्यार्थ्यांची ऑनलाईन अभ्यासक्रम अध्ययनामध्ये रुची व तत्परता वाढावी या उद्देशाने विश्वविद्यालय मूक समिती प्रत्येक षाड्मासिकसत्रारंभी विद्यापीठीय ठराविक अभ्यासक्रमांमधील आन्तरिक गुणदान करण्याच्या हेतूने ठराविक ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमांचे नावनिर्देशन करू शकते. विद्यार्थ्यांनी अश्या ऑनलाईन अभ्यासक्रमांसाठी परीक्षा आवेदन करणे अनिवार्य नाही. मात्र सदर अभ्यासक्रमांचे विधिवत अध्ययन करून साप्ताहिक असाइमेंट ऑनलाईन जमा करणे सर्वांना अनिवार्य राहील. अभ्यासक्रमाध्ययना अन्ती त्या–त्या अभ्यासक्रमाचे मार्गदर्शक (मेंटर) प्राध्यापक/प्राचार्य/विभागप्रमुख संबंधित विद्यार्थ्यांचे असाइमेंट स्कोर/मार्क संबंधित विभागाकडे/परीक्षाविभागाकडे पुढील प्रक्रियेस्तव जमा करतील.

14) जुलै व जानेवारी दरम्यान स्वयम सत्रारंभी अभ्यासमंडळे किंवा विद्वत्परिषद सभा घेण्यात न आल्यास किंवा घेणे अशक्य राहिल्यास विश्वविद्यालय–मूक–समितीने सभेत घेतलेले निर्णय मा. कुलगुरूंच्या विशेष मान्यतेसह व प्राप्त–सूचनांसह पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित होतील.

15) यु.जी.सी. मूक वेबसाईट वरती प्रकाशित मार्गदर्शक नियमावलीतील वेळोवेळी (ऑनलाईन ज्ञानार्जन अभ्यासक्रमातील मार्क–प्रारूप, कोर्स–अवधी किंवा निर्धारित क्रेडिट्स इत्यादीत) होणारे बदल विश्वविद्यालयातील त्या–त्या सत्रात विशेष मान्यतेसह कार्यान्वित होण्यास योग्य असतील.

***

## Useful Guidelines for Credit Transfer Implementation to the University Student Marks Sheet under NPTEL & other than-NPTEL (SWAYAM) MOOCs

1. University Examination Section will transfer the credits to the University department or conducted/affiliated college student marks sheets for the SWAYAM Online Courses (MOOCs) which are already decided by the University MOOC Committee in beginning (tentatively in months of July & January) of the semester.

   For that, consent letter (along with qualified SWAYAM Certificate & attachments mentioned below in item-2) from the relevant students will be forwarded in time by the Head of Department/Principal for further essential process. In that regard, nominated college SWAYAM Mentor & University SWAYAM Coordinator will orderly assist college principal and Head of the Department.
2. While forwarding the application/consent form for credit transfer of department or college students, it will be expected to follow the courses recommended by the University MOOC Committee. Also, MOOCs List (already published in course section on university website), Credit Transfer Circular/Notification, MOOCs Directions & these rules are to be attached along with.
3. On behalf of the University MOOC Committee, the elective courses from CBCS programmes will basically be fixed with MOOCs as alternative for the relevant semester. So, the Academic Section of the university may put such courses in alternative options with SWAYAM online Courses hereafter.
4. SWAYAM MOOCs are to be of Four weeks, Eight weeks, Twelve weeks, fifteen weeks, Sixteen weeks and twenty-four weeks.
5. Its course credits as per the prescribed duration of SWAYAM MOOCs in NPTEL (SWAYAM) as well as CEC (SWAYAM) recommendation guidelines (published on SWAYAM website) as for one / two credits for a total period of four weeks; two / three credits for a total period of eight weeks; three / four credits for a total period of twelve weeks & four/five credits for a total period of fifteen/sixteen weeks duration MOOCs. Hence,
   - MOOCs with a duration of four weeks will be eligible for a total of one or two credit transfers against concerned university course.
   - MOOCs with a duration of Eight weeks will be eligible for a total of two or three credit transfers against concerned university course.

- MOOCs with a duration of twelve weeks will be eligible for a total of three or four credit transfers against concerned university course.
- MOOCs with a duration of fifteen/sixteen weeks will be eligible for a total of four or five credit transfers against concerned university course.

6. It is mandatory to send the credit transfer consent/application forms of concerned students as maintained in item no.1 along with results of the MOOCs implemented on that session by the college/department to the examinations section, KKSU, Ramtek by post or at email-exam@kksu.org within at least 10 days.

   However, the University Examination Department will be expected to receive the application form/credit transfer consent from at least prior to filling up the University Examination Form's last dates in that particular session/semester. This is the responsibility of the nominated Mentor Professor and the Principal of the concerned college and the Head of the university department; so that it will be easier for the university to take further action.
7. In some special cases, a qualified MOOC (by department or college student) will remain valid to apply or send consent/application form for credit transfer implementation to the university till one year from the date of result declaration of that particular MOOCs. But in order to transfer the credits during the year or semester, he/she applied, must be pursuing the same university programme without any gap in affiliated college or university department.
8. The conversion of the obtained percentage/marks in particular MOOC to the grade/marks of the university course will be in accordance with the grade format given in ordinance prescribed by the University of that Course. (However, it is to be noted that the minimum passing mark of the MOOCs is 40 or more than 40.)
9. Courses hosted by SWAYAM are in the patterns of 75: 25 (Proctored Online Examination Marks: Assignment Marks). However, this format appears to have changed from time to time. It is also clearly mentioned on the MOOC certificate received.

   However, the pattern of written exam & internal marks of the respective courses (e.g. 60:40, 70:30 or 80:20 etc.) in the university syllabus may vary with MOOCs pattern. In such cases, obtained marks scores in proctored MOOC online examination & MOOC assignment both will be converted or assigned to the university course grade/marks format (*viz.* 60:40, 70:30 or 80:20) in accordance with particular course ordinance. For example –Student 'A' enrolled with B.A Sanskrit university programme; hereafter applies/ enrolls for MOOC (e.g. Introduction to Spoken Sanskrit) online course recommended on behalf of the Course One: Sanskrit by the University MOOC Committee & approved by the essential authorities. He/she while learning the MOOC in stipulated duration has submitted assignments time to time online to SWAYAM. Paying the prescribed exam fee, passed the MOOC Procter examination. Suppose, the marks score obtained in MOOC by the student is 45 /75 : 15 / 25 & the result in percentage is 60. Then the total marks score obtained in MOOC will be converted in accordance with the grade format & marks pattern (80:20 etc.) given in B.A (Sanskrit) course ordinances.

Converted MOOC result will be placed with following wordings: SWAYAM Online Course: Introduction to Spoken Sanskrit in his B.A. first semester mark sheet instead of the university prescribed course name i.e. Sanskrit.

10. Due to some unavoidable reason, if a concerned student gets failure or absent in MOOC's Proctor Online exams– (then, the student can go through any one of the options given below)

Option-1 *(Attempt in Next Semester)*

The university will declare result as failure or absent under the course title SWAYAM Online Course as given in item no.9. Hereafter, the student needs to write a detailed request letter and forward through the college principal/ HoD to the university office for availing the same MOOC or any MOOC (recommended by University MOOC Committee) for enrolment in next semester. The student will write the same MOOC or any MOOC (recommended by University MOOC Committee) during the semester and provide details of qualified MOOC through the college principal/ head of the department to the university exam office at least well prior the last date of final semester examination form submission. It's compulsory to send details of qualified MOOC at least before the last date of final semester examination form submission to the university and the concerned SWAYAM Mentor/college principal/ head of the department will be fully responsible for that.

Option-2 *(May be permitted to attend the university prescribed course exam in the same Sem.)*

Before the commencement of the University examinations in the relevant semester, MOOC failure student in the same semester may request through the college principal/ head of the department to the university exam office to grant permission to write the written and internal examinations of the university prescribed course. However, the forwarded application /request letter in this regard, must be received in the examination section before the commencement of the university examination in the relevant session. It will be the responsibility of the concerned student/mentor/principal/ department head to confirm the relevant permission given by the university examination section. Only after the confirmation, the written & internal examination of university prescribed course will be acceptable.

11. This will be allowed to register for written and internal university prescribed course examinations instead of MOOC in further semesters; if a student constantly fails in proctored examinations but gets at least (10/25) passing score or more than 10/25 passing score in internal/assignment marks during the MOOC. Hereafter, the details regarding SWAYAM Online Course (given in item 10 option-1) will be replaced with university course result as usual. This option will enable a MOOC failure student to finally succeed the university programme and his / her mark sheet will remain the same as that of a normal student.

12. In special Cases like nation-wide pandemic/lockdown like Covid-19 etc., if SWAYAM could not organize the proctored online examinations, in such cases, the University MOOC Committee can also specify any appropriate plan like to use of obtained internal assignment scores of concerned MOOC and submission of a suitable evaluation artefact (paper pen test or

mcq tests) as mentioned by the committee in such cases. Accordingly university exam section will proceed the same.

13. The University MOOC Committee may also recommend some MOOCs in each semester, which are relevant to the university prescribed courses and can be considered for as Internal Marks in university prescribed courses. This recommendation only intends to develop the engagement & interest of all students in online courses.

    For that, students do not need to write MOOC proctored exams. Only they have to learn the courses and submit the assignments regularly online. In end of the enrolled MOOCs, Course-Mentor teachers will submit the assignment scores/marks of concerned students to the concerned department & the department to university exam section. By the way, a number of MOOCs may be considered for internal marks in university prescribed courses. Conversion of MOOCs Assignments Marks/Score in university internal marks will be as mentioned in item no.8.

14. Decisions of the University MOOC Committee will be approved & stand valid to further process through the special permission (with suggestions, if any) of the honorable vice chancellor; in case of, the board of studies /academic council may not be able to meet every semester in Jan and July.

15. The amendments in regard of pattern of marks, duration and allotted credits for MOOCs are implementable with special permission in accordance with the guidelines published on UGC-MOOCs website.

***